गोदातीर समाचार दि. ०२/०८/२०२२

# हैद्राबादमध्ये आरोपीकडून सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

## शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाची २४ तासात कारवाई



नांदेड- दोन ते तीन टन वजनाचे लोखंडी ब्रेकर हैद्राबाद येथे घेऊन गेलेल्या आरोपीला शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाने २४ तासात पकडून आणले. चोरलेला ६ लाखांचा ऐवज जप्त केला आहे.

नांदेडमध्ये सध्या सार्वजनीक रोडचे काम चालु आहे. शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नाईक चौकचे सार्वजनीक रोडचे काम मे इंफ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमीटेड या कंपनीकडे आहे. काम संपल्यानंतर रात्रीला नाईक चौक येथील सार्वजनीक रोडवर ठेवलेल्या लोखंडी पोकलेनचे ब्रेकर वजन अंदाजे २ ते ३ टन किंमत सहा लाख रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची कंपनीचे, साईड इंचार्ज प्रदिप किशन बावीसकर (रा.भास्करनगर नमस्कार चौक नांदेड) यांनी फिर्याद दिली होती. याप्रकरणी शिवाजीनगर ठाण्यात ३० जूलै रोजी गुन्हा दाखल झाला होता. पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशिकर यांना मिळालेल्या गोपनिय माहितीचे आधारे वरिष्ठांचे आदेशाने गुन्हे शोध पथकातील अधिकारी, कर्मचारी यांना तात्काळ तेलंगाना राज्यातील हैद्राबाद पाठवुन गुन्ह्यातील आरोपी किरण ज्योतीबाराव बल्लाळ (रा. मनाठा ता. हदगांव) यास गुन्ह्यातील मुददेमाल एकुण सहा लाख सहीत हैद्राबाद येथुन तात्काळ ताब्यात घेत-ले. सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अपर पोलीस **(पान ३ वर...)**

------------

**हैद्राबादमध्ये आरोपीकडून...**

अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी (शहर) चंद्रसेन देशमुख व पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील प्रमुख स. पो. नि. रवि वाहुळे, पो.उप.नि मिलींद सोनकांबळे, शेख इब्राहीम, दिलीप राठोड, रविशंकर बामणे, देविसिंग सिंगल, शेख अझहर, दत्ता वडजे यांनी पार पाडली.